# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या महसुली जमा अहवालामधील गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ५.१, ५.२, ५.३ व ५.४) यावरील**

# सहासष्टावा अहवाल

सत्यमेव जयते

(सदर अहवाल, मा. अध्यक्षांचे निदेश क्र. ९ (सातवी आवृत्ती २०१४) आणि मा. सभापती यांचे निदेश क्र. ९ (पाचवी आवृत्ती २०११) अनुसार मा. अध्यक्ष आणि मा. सभापती यांना दिनांक ४ सप्टेंबर, २०१९ रोजी सादर करण्यात आला.)

(दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी विधानसभेच्या/विधानपरिषदेच्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
२०१९

# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या महसुली जमा अहवालामधील गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ५.१, ५.२, ५.३ व ५.४) यावरील**

## सहासष्टावा अहवाल

एचबी १५०६–१

# लोकलेखा समिती

## २०१७-२०१८

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

*(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

**(१०) श्री. प्रशांत ठाकूर वि.स.स.

(१०अ) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

***(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

****(२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

*****(२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

******(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

*******(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**निमंत्रित**

********(२७) श्री. प्रसाद लाड, वि.प.स.

*********(२८) श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.

**सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. यू. के. चव्हाण, सचिव (EM),

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

(३) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.,

(४) श्री. सो. न. सानप, अवर सचिव,

(५) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी,

(६) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* **श्री. योगेश सागर, वि.स.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

** **श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

*** **श्री. सुरेश ऊर्फ बाळू धानोरकर, वि.स.स. यांनी दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी आपल्या सदस्यपदाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.**

**** **श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

***** **श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

****** **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे सदर जागा रिक्त झाली.**

******* **श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.**

******** **श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक १ मार्च, २०१९ रोजी "विशेष निमंत्रित" समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

********* **श्री. रामदास आंबटकर, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक २ मे, २०१९ रोजी "विशेष निमंत्रित" समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवाल यावर विचार करून लोकलेखा समितीचा सहासष्टावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ११ जून, २०१९ रोजी प्रधान सचिव, गृह (परिवहन) विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली माहिती परिशिष्ट “ अ ” मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट “ ब ” मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २३ जुलै, २०१९ रोजीच्या बैठकीत सन २०१४-१५ वर्षाच्या महसुली जमा अहवालातील गृह (परिवहन) विभागासंदर्भात तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारूप अहवालाला मान्यता दिली.

**विधान भवन :**
मुंबई/नागपूर,
दिनांक : २३ जुलै २०१९.

**गोपालदास अग्रवाल,**
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

**अनुक्रमणिका**



| अनुक्रमांक | विभाग व तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | **प्रस्तावना** | (पाच) |
| **(१)** | **गृह (परिवहन) विभाग** | १ |
| | (परिच्छेद क्र. ५.१) | १ |
| | (परिच्छेद क्र. ५.२) | २ |
| | (परिच्छेद क्र. ५.३) | ३ |
| | (परिच्छेद क्र. ५.४) | ४ |

## गृह (परिवहन) विभाग

**१.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ५.१, ५.२, ५.३ व ५.४ यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले :-

| अ. क्र. | परिच्छेद क्रमांक | परिच्छेदाचा तपशिल | स्पष्टीकरणात्मक अनुपालन |
|---|---|---|---|
| १ | ५.१ | **कर प्रशासन**<br><br>मोटार वाहन विभागांतर्गत करांची व इतर जमांची आकारणी व संकलन यांचे नियमन केंद्रीय मोटार वाहन अधिनियम १९८८, महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम १९५८ आणि मुंबई मोटार वाहन प्रवासी कर अधिनियम, १९५८ व त्याअंतर्गत केलेले नियम याव्दारे केले जाते. शासनाच्या गृह विभागाच्या प्रधान सचिवांच्या( परिवहन) सर्वकष नियंत्रणाखाली परिवहन आयुक्तांकडून या अधिनियम व नियमांची अंमलबजावणी होते ज्यांना अतिरिक्त आयुक्त, सहआयुक्त व उपायुक्त आणि प्रादेशिक व उप परिवहन अधिकारी यांचे सहाय्य लाभते. मोटार वाहन जमा यांत प्रामुख्याने मोटार वाहनांवरील कर, माल व उतारुंवरील कर यांचा समावेश होतो. | सदर परिच्छेदामध्ये परिवहन विभागामार्फत कोणत्या कायद्यानुसार कर वसुल केला जातो तसेच कोणते कर वसुल केले जातात व त्यावर कोणाचे नियंत्रण आहे याबाबतची माहिती दिली असून महालेखापरिक्षकांनी No Remarks असा अभिप्राय दिलेला आहे, असे गृह विभागाच्या दि. १७/०१/२०१८ च्या पत्रानुसार कळविले आहे. |

| अ. क्र. | परिच्छेद क्रमांक | परिच्छेदाचा तपशिल | स्पष्टीकरणात्मक अनुपालन |
|---|---|---|---|
| २ | ५.२ | (खाली पहा) | (खाली पहा) |

**परिच्छेदाचा तपशिल**

**अंतर्गत लेखापरीक्षा**

प्रत्येक प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये एक अंतर्गत लेखापरीक्षा शाखा असते जिच्या प्रमुखपदी लेखा अधिकारी असतात. १ सप्टेंबर १९७१ च्या आदेशात लेखापरीक्षा करण्यासाठीचे निकष नमूद केले आहेत ज्यामध्ये नव्याने नोंदणी झालेल्या वाहनांचे कर निर्धारण तपासणे, रोख पुस्तिका, जडवस्तू, इत्यादींची तपासणी विहीत केली आहे.

**तक्ता ५.२ मध्ये** लेखा परिक्षेसाठी नियोजित केलेली युनिट्स व त्यातील प्रत्यक्षात लेखापरीक्षा केलेल्या युनिट्सची स्थिती दर्शविलेली आहे.

**तक्ता ५.२**

| वर्ष | नियोजित युनिट्सची संख्या | लेखापरिक्षा केलेल्या युनिट्सची संख्या | लेखापरीक्षा अभिक्षणांची संख्या | ३१.०३.२०१५ पर्यंत निपटारा केलेली लेखापरीक्षा अभिक्षणे | ३१.०३.२०१५ रोजी प्रलंबित अभिक्षणे |
|---|---|---|---|---|---|
| २०१०-११ | १९ | १९ | ४५४ | ३६२ | ९२ |
| २०११-१२ | १८ | १८ | ३३२ | २५८ | ७४ |
| २०१२-१३ | २९ | २९ | १,१७१ | ८०६ | ३६५ |
| २०१३-१४ | ३२ | ३२ | ६९३ | १९३ | ५०० |
| २०१४-१५ | २ | २ | ३५ | ० | ३५ |

**स्त्रोत : विभागाने सादर केलेली माहिती**

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, नियोजित युनिटसची संख्या आणि लेखापरीक्षा केलेल्या युनिट्सची संख्या २०१३-१४ मधील ३२ वरुन कमी होऊन २०१४-१५ मध्ये दोन इतकी झाली. याची कारणे जरी मागवली होती तरी अद्याप प्राप्त झाली नाहीत.

**स्पष्टीकरणात्मक अनुपालन**

नियोजित युनिट्सची संख्या आणि लेखापरिक्षा केलेल्या युनिट्सची संख्या सन २०१३-१४ मधील ३२ वरून कमी होऊन २०१४-१५ मध्ये दोन इतकी झाली. त्याची कारणमिमांसा पुढीलप्रमाणे आहे.

महालेखापरिक्षकांनी २०१५ मध्ये सन २०१३-१४ पर्यंतच्या नियोजित युनिट्सच्या संख्येबाबत सांख्यिकीय माहिती मागितली होती. त्यानुसार सन २०१३-१४ ची सांख्यिकीय माहिती सादर केली होती.

सदर माहिती जानेवारी २०१५ मध्ये सादर करण्यात आली होती. त्यामध्ये सन २०१४-१५ च्या फक्त २ कार्यालयांची माहिती कळविली होती. उर्वरित कार्यालयाची माहिती वर्ष संपणे बाकी असल्याने अप्राप्त होती. त्यामुळे नियोजित युनिट्सची संख्या २ दिसून येत आहे. सन २०१४-१५ मध्ये एकूण ४६ युनिट्सचे लेखापरिक्षण झालेले आहे.

सन २०१०-११ ते सन २०१४-१५ पर्यंतच्या प्रलंबित आक्षेपांपैकी काही आक्षेपांचा निपटारा झाला असून प्रलंबित आक्षेपांची संख्या परिशिष्ट १ मध्ये दिली आहे.

३ | ५.३

**लेखापरीक्षेचे परिणाम**

वर्ष २०१४-१५ मध्ये, मोटार वाहन कर अधिनियम इत्यादींशी संबंधित ४८ कार्यालयांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत, २९९ अभिक्षणांत ₹ ७५.३१ कोटी अंतर्भूत रक्कमेच्या न्यून कर-निर्धारण व इतर अनियमितता आढळून आल्या, ज्या खालील **तक्ता ५.३** मध्ये दर्शविलेल्या प्रवर्गात मोडतात.

**तक्ता ५.३**

(₹ कोटीत)

| अ.क्र. | प्रवर्ग | अभिक्षणांची संख्या | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | चुकीचे दर आकारल्यामुळे कराची न/कमी आकारणी | १८३ | ७४.९५ |
| २. | चुकीची सुट दिल्यामुळे/वर्गीकरण यामुळे कराची कमी आकारणी | ३ | ०.०२ |
| ३. | अतिरिक्त परतावा आणि इतर | ११३ | ०.३४ |
| | **एकूण** | **२९९** | **७५.३१** |

वर्ष २०१४-१५ मध्ये, संबंधित विभागाने १६६ अभिक्षणातील ₹. ३५.७२ कोटी मोटार वाहन कराचे न्यून निर्धारण, कमी आकारणी मान्य केली आणि संपूर्ण रक्कम वसुल केली ज्यापैकी ₹. १५.२८ लाख रक्कमेची २० अभिक्षणे वर्ष २०१४-१५ शी संबंधित होती आणि उर्वरीत त्यापुर्वीच्या वर्षांशी संबंधित होती. ₹. ८.८५ कोटी सम्मिलित असलेली लेखापरिक्षा अभिक्षणे खालील परिच्छेदात चर्चिली आहेत.

सन २०१४-१५ मध्ये परिवहन विभागाने मार्च २०१५ पर्यंत प्रलंबित असलेल्या परिच्छेदांपैकी एकूण १६६ परिच्छेदांचे अनुपालन करून रू. ३५.७२ कोटी वाहन कराचे न्यून निर्धारण, कमी आकारणी मान्य करून ती संपूर्ण रक्कम वसूल केली आहे. रू. ३५.७२ कोटीमध्ये सन २०१४-१५ च्या अहवालातील २९९ प्रकरणांमधील २० परिच्छेदांची रू. १५.२८ लाख रक्कम समाविष्ट आहे, असे महालेखापाल यांच्या अहवालात नमूद आहे.

आतापर्यंत वर नमूद २९९ परिच्छेदांमधील रू. ७५.३१ कोटीपैकी रू. २७.९७ कोटी वसुल झालेले असून रू. २०.२५ कोटी रकमेचे परिच्छेद मा. महालेखाकार कार्यालयाने निर्लेखित केलेले आहेत. उर्वरीत रू. २७.०९ कोटीची वसूली बाकी आहे.
(सोबत **परिशिष्ट २** जोडले आहे.)

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | ५.४ | **<u>लेखापरीक्षा अभिक्षणे</u>**<br>प्रादेशिक परिवहन कार्यालये (RTOs) उप प्रादेशिक परिवहन कार्यालये (DYRTOs) यांच्या अभिलेख्यांच्या तपासणीत महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (MMVT अधिनियम) आणि इतर संबंधित अधिनियमांच्या तरतुदींचे पालन न केल्याची बरीच प्रकरणे उघडकीस आली, जी या प्रकरणांच्या पुढील परिच्छेदात नमूद केलेली आहेत. ही प्रकरणे उदाहरणादाखल असून लेखापरिक्षेत केलेल्या चाचणी तपासणीवर आधारीत आहेत. अशी लोपने दरवर्षी लेखापरीक्षेत निदर्शनास आणून दिली जातातच परंतु, या अनियमितता सातत्याने तशाच राहतात तसेच लेखापरिक्षा होईपर्यत उघडकीस येत नाहीत. शासनाने अंतर्गत नियंत्रण व्यवस्थेत सुधारणा करणे आवश्यक आहे जेणेकरुन अशा प्रकरणांची पुनरावृत्ती टाळणे शक्य होईल. | महालेखापाल कार्यालयाकडून सदर परिच्छेदाबाबत परिक्षण (vetting) केले असता मा. महालेखापालांनी सदर परिच्छेद हे सांख्यिकीय स्वरूपाचे असल्याने सदर परिच्छेदावर No Remarks असे गृह विभागाच्या दि. १७/०१/२०१८ च्या पत्रानुसार कळविले आहे.<br>महालेखापाल कार्यालयाकडून चाचणी लेखापरिक्षण केले जाते. परंतु परिवहन विभागामार्फत प्रादेशिक कार्यालय स्तरावर अंतर्गत लेखापरिक्षण पथक कार्यरत असून ते पथक त्यांच्या व त्यांच्या अधिनस्त उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांचे अंतर्गत लेखापरिक्षण करत असून १५ प्रादेशिक कार्यालयांमध्ये लेखापरिक्षण पथके कार्यरत असून ती पथके त्यांच्या व त्यांच्या अधिनस्त प्रादेशिक कार्यालयाचे लेखापरिक्षण करतात. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | ५.४.१ | **प्रवासी कराची वसुली न करणे**<br>**एजंसीद्वारे वसूल करण्यात आलेल्या करामधून प्रवासी कराची अदायगी न केल्यामुळे ₹. ७.८६ कोटी प्रवासी कराची कमी वसुली झाली**<br>मुंबई मोटार वाहन (प्रवासी कर) अधिनियम, १९५८ (१९५८ चे Bom LXVII), वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार, कलम २१ आणि नियम ३-A अंतर्गत प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही नगरपालिका क्षेत्रात आणि नगरपालिका व लगतच्या ग्रामीण भागात जोडणाऱ्या रस्त्यांवर टप्पा वाहतुकीने नेणाऱ्या प्रवाशांना टप्पा वाहतुकीच्या चालकांना देय प्रवास भाड्याच्या रक्कमेसह ३.५ टक्क्यांपेक्षा जास्त असलेल्या कराच्या रक्कमेची माफी दिली.<br>प्रादेशिक परिवहन अधिकारी (नागरी), नागपूर (RTO) यांच्या दस्तावेजांच्या/संलेखांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले (मार्च २०१३) की नागपूर महानगरपालिकेने फेब्रुवारी २००७ मध्ये शहर बस परिवहन यंत्रणेचा कार्यभार महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळाकडून आपल्या हाती घेतला आणि एका एजेंसी सोबत नागपूर शहरात बांधा, वापरा आणि मालकी हक्क तत्त्वावर बस वाहतूक सेवा देण्यासाठी एक करारनामा आणि पूरक करारनामा (अनुक्रमे फेब्रुवारी २००७ आणि मार्च २०१०) केला. सदर करारनाम्याच्या खंड ४.१ अनुसार शासनास सर्व कर अदा करण्यास एजेंसी जबाबदार होती. त्यानुसार NMC च्या वतीने एजेंसी ने शहर बस सेवा प्रदान केली. तथापि, टिकीट विक्रीतून प्राप्त झालेल्या रक्कमेचे तपशील RTO आणि NMC दोन्ही कडे नव्हते. एजेंसीच्या लेखापरिक्षीत लेखांच्या पडताळणीत असे आढळले कि एजेंसीने टिकिट विक्रीपासून २००६-०७ ते २०१३-१४ दरम्यान एकूण ₹. २३४.४५ कोटी वसूल केले ज्यात शासनास देय असलेला ₹. ७.९३ कोटी रक्कमेचा प्रवासी कर अंतर्भूत होता. त्यापैकी आज पर्यंत फक्त ₹. सात लाख शासन खाती जमा करण्यात आले आहे. अशाप्रकारे, NMC/ एजेंसीने प्रवासी कराचे ₹. ७.८६ कोटी अदा केले नव्हते.<br>लेखापरीक्षेने निदर्शनास आणल्यावर (मार्च २०१३) RTO ने नमूद केले की नागपूर महानगर पालिकेने मुंबई मोटार वाहन (प्रवासी कर) अधिनियम, १९५८ अनुसार विवरण सादर केले नाही आणि ₹. ७.८६ कोटी प्रवासी कराची कमी वसुली मान्य केली (एप्रिल २०१५). या बाबत पुढील प्रगती प्राप्त झाली नाही.<br>आम्ही ही बाब मे २०१५ मध्ये शासनास कळविली; त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही (फेब्रुवारी २०१६). | महाराष्ट्र शासन, गृहविभाग (परिवहन) मुंबई यांचे पत्र क्रमांक एमव्हीआर १२०६/नाग/परि-२/दिनांक ०७.०२.२००७ अन्वये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या तर्फे चालविण्यात येत असलेली शहर बस सेवा नागपूर महानगरपालिका नागपूर यांना हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.<br>२. महालेखापाल, महाराष्ट्र - २ नागपूर यांनी मुंबई मोटार वाहन (उतारुवरील कर आकारणी) अधिनियम, १९५८ आणि नियम १९५९ च्या तरतुदीनुसार प्रवासी कराची आकारणी ७ कोटी ९३ लाख महानगरपालिकेकडे थकीत असल्याबाबत शासनास अवगत केले आहे.<br>३. प्रवासी कर आणि बालपोषण अधिभार शासनास अदा करण्याकरीता प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर यांनी पत्र दि. २६.०७.२०१३, दि. २३.०६.२०१४, दि. ०१.११.२०१४ आणि अर्ध शासकीय पत्र दि. १०.०४.२०१५ नुसार महानगरपालिका नागपूर यांना अवगत केले होते. तसेच प्रवासी कर व बालपोषण अधिभार अदा न केल्याबाबत नागपूर महानगरपालिका, नागपूर यांच्यावर कारणे दाखवा नोटीस क्रमांक १०५३८ दि. ०८.०७.२०१५ बजावण्यात आली होती.<br>४. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक. ९१३१ दि. ०५.०८.२०१५ च्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिका, नागपूर यांच्याद्वारे शहरात पुरवित असलेल्या शहर बस सेवेअंतर्गत राबवित असलेल्या नोंदणीकृत मालक/ताबेदार यांचेकडून प्रवासी कर वसूल करावयाचा आहे. महालेखाकार |

(लेखापरिक्षण) II, महाराष्ट्र यांनी केलेल्या लेखापरिक्षणा अंतर्गत सन २०१३-२०१४ पर्यंत परवाना धारकाकडून रू. ७.९३ कोटी प्रवासी कर व मोटार वाहन कर शासनास अदा करायचे होते. त्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर यांच्याकडून विशेष तपासणी पथकाद्वारे बसेस अटकावून ठेवण्यात आल्या होत्या.

तथापि, अटकावून ठेवलेली वाहने मोटार वाहन कर व तडजोड शुल्क वसूल करून वाहने मुक्त करण्यात आली.

५. आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांनी त्यांचे पत्र दि. २०.०८.२०१५ अन्वये सचिव -२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्रवासी कर व बालपोषण अधिभाराची रक्कम रू. ७.९३ कोटी व अतिरिक्त व्याज वाहतूकदारास शासनाने दयावयाच्या सवलती प्रतिपुर्ती रक्कम रू. ५३,८८,२९,१९२/- मधून कपात करून सवलत रकमेची प्रतिपुर्ती करण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर यांनी मुंबई मोटार वाहन (प्रवाशांवरील कर) नियम, १९५८ च्या नियम ७ अनुसार प्रवासी कर भरलेला नसल्यामुळे नमुना ६ मध्ये मागणीपत्र दिनांक ०१.०९.२०१६ व दि. २१.०२.२०१८ रोजी महानगरपालिका नागपूर यांना पाठविले आहे.

थकित प्रवासी कर व बालपोषण अधिभाराचा भरणा करणेकरिता आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांना परिवहन आयुक्त , महाराष्ट्र राज्य यांनी दि. १६.०३.२०१९ व दि. ०९.०५.२०१९ रोजीच्या अर्धशासकिय पत्राद्वारे कळविले आहे.

नागपूर महानगरपालिका यांनी त्यांच्या दि. १२.०२.२०१९ रोजी शहर बस वाहतूकीतील २३० वाहने स्क्रॅप करून त्यामधून प्राप्त होणाऱ्या रकमेतून थकीत प्रवासी कर व बालपोषण अधिभाराचा भरणा करण्यात येईल, असे कळविले आहे.

६ ५.४.२

**मोटार वाहन कराची वसूली न करणे**

**RTO - औरंगाबाद, धुळे, नाशिक, पुणे आणि ताडदेव; DY.RTO - अकलूज, अंबेजोगाई, हिंगोली, जालना, कल्याण, परभणी, पेण, श्रीरामपूर आणि वाशी.**

**३३० प्रकरणांत विविध प्रकारच्या वाहनांवर ₹ ९९.३१ लाख रक्कमेची मोटार वाहन कराची वसुली झाली नव्हती.**

MMVT अधिनियम च्या कलम ४ आणि त्या अंतर्गत केलेल्या नियमांनुसार राज्यामध्ये वापरण्यासाठी ठेवलेल्या सर्व वाहनांवर नोंदणी केलेल्या भारीत वजनानुसार किंवा आसन क्षमतेनुसार विहित केलेल्या दराने कर भरावयाचा असतो. राज्यामध्ये वापरासाठी ठेवलेल्या ज्या वाहनांवर उपकरणे बसविलेली असतात, त्यावर त्यांच्या विभारित वजनाच्या आधारावर विहीत दराने कर देय असतो. वाहन मालकांकडून केलेली वसुली, जारी केलेल्या मागणी नोटीसा इत्यादींची माहिती रोख शिल्लक आढावा नोंदवहीत (CBRR) ठेवलेली असते.

जानेवारी २०१३ ते मार्च २०१४ दरम्यान चाचणी तपासणी केलेल्या १४ कार्यालयांच्या CBRR वरुन असे आढळून आले की परिवहन श्रेणीतील वाहने (बस)/ परिवहन श्रेणीतील वाहने(माल)/उपकरणे बसविलेली वाहने अशाप्रकारच्या ३३० वाहनांच्या बाबतीत जुलै २००९ ते मार्च २०१४ दरम्यान एक महिना ते ४७ महीने या कालावधीसाठीचा ₹. ९९.३१ लाख इतका कर वसुल करण्यात आला नव्हता, जे **तक्ता ५.४.२** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता ५.४.२** **(₹ लाखात)**

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | प्रकरणांची संख्या | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | परिवहन श्रेणीतील वाहने (बस) | ८४ | ५९.१५ |
| २. | परिवहन श्रेणीतील वाहने (माल) | २०९ | ३१.५८ |
| ३. | उपकरणे बसविलेली वाहने | ३७ | ८.५८ |
| | **एकूण** | **३३०** | **९९.३१** |

जानेवारी २०११ ते मार्च २०१४ दरम्यान हे निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने अभिक्षण मान्य केले आणि ११९ प्रकरणांत मे २०१३ आणि डिसेंबर २०१५ दरम्यान ₹. २४.२२ लाखाची वसुली केल्याचे कळविले. उर्वरित रक्कमेच्या वसुलीबाबतचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

आम्ही ही बाब शासनाला मे आणि जून २०१५ मध्ये कळविली; त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही. (फेब्रुवारी २०१६).

सोबतच्या परिच्छेदात मा. महालेखापालांनी ३३० आक्षेपित प्रकरणांची रू. ९९.३१ लाख रक्कम नमूद केली आहे.

सदर परिच्छेदामध्ये एकूण १४ कार्यालयांचा अंतर्भाव आहे. त्यापैकी अकलूज, हिंगोली, जालना, व श्रीरामपूर या ४ कार्यालयांची पूर्णत: वसुली झालेली आहे. उर्वरीत १० कार्यालयांची अंशत: वसुली झाली आहे.

सदर परिच्छेदात दर्शविलेल्या एकूण ३३० प्रकरणांतील रु. ९९.३१ लाख इतक्या रक्कमेपैकी २३८ प्रकरणांची रक्कम रु. ५६.८७ लाख वसुली करण्यात आली आहे. उर्वरीत ९२ प्रकरणातील रू. ४२.४३ लाख वसुली होणे प्रलंबित आहे. संबंधित प्रादेशिक/ उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांकडून वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

सोबत **परिशिष्ट ३** मध्ये कार्यालयनिहाय कर वसुली व थकित रकमेचा तपशील जोडला आहे.

**साक्ष-**

**२.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.५.१-कर प्रशासन, ५.२-अंतर्गत लेखापरिक्षा, ५.३-लेखापरीक्षेचे परिणाम व ५.४-लेखापरिक्षा अभिक्षणे या परिच्छेदांबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ११ जून, २०१९ रोजी गृह (परिवहन) विभागाचे प्रधान सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

**परिच्छेद क्र.५.१ - कर प्रशासन**

परिवहन विभागाचे सन २०१४-१५ पर्यंतचे खूप मोठ्या प्रमाणात परिच्छेद प्रलंबित आहेत. टॅक्सची कमी आकारणी झाल्यामुळे हे परिच्छेद आलेले आहेत. ऑडिट करण्याचा मूळ उद्देश असा असतो की, सर्व नियमांचे पूर्णपणे पालन झाले आहे किंवा कसे हे पाहणे. तसेच नियमानुसार करांची वसुली केली गेली आहे किंवा नाही. मोटार वाहन कर, गुडस् कर, प्रवासी कर यांची परिवहन विभागाकडून वसुली केली जाते. बहुतांश परिच्छेद त्याच्याशी संबंधित आलेले आहेत. यामध्ये काही प्रमाणात वसुली झाली असली तरीही मोठ्या प्रमाणात अपयश आलेले आहे. विभागाने दिलेल्या तक्त्यानुसार दिसून येते की, १४०० ऑब्झर्व्हेशनबाबत अद्यापही म्हणजे मार्च, २०१९ पर्यंत काहीही कार्यवाही करण्यात आली नव्हती. सदर आक्षेप निकाली काढण्याबाबत विभागाची काय भूमिका आहे ? अशी पृच्छा समितीने साक्षीच्या वेळी केली असता, अंतर्गत लेखापरीक्षणाच्या परिच्छेदांमध्ये मॉनिटरी आणि नॉन-मॉनिटरी असे दोन प्रकार असतात. कारण विभाग प्रत्येक आर.टी.ओ. ऑफिसचे अकाउंटस् आणि प्रशासकीय असे दोन्ही इन्स्पेक्शन सोबतच करतो. त्यामुळे हे सर्व मॉनिटरी आहेत असे गृहीत धरणे उचित होणार नाही. मॉनिटरी व्हॅल्युएशन पाहायचे झाले तर सन २०१४-१५ मध्ये टार्गेटपेक्षा जास्त कलेक्शन करण्यात आले आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

**परिच्छेद क्र. ५.२ अंतर्गत लेखापरिक्षा**

सन २०१०-११ मध्ये ९२ आक्षेप होते त्यापैकी केवळ २४ आक्षेपाबाबत कार्यवाही करण्यात आली. सन २०११-१२ च्या ७४ पैकी केवळ ८ बाबत कार्यवाही केली. सन २०१२-१३ मधील ३६५ पैकी केवळ १०१ ॲटेंड केले व मार्च, २०१९ पर्यंत २६४ पेंडिंगच होते, अशी पृच्छा समितीने केली असता, ४५४ पैकी ३६२ आक्षेप निरसित केले आहेत. ३३२ पैकी २५८ व ११७१ पैकी ८०६ निरसित केलेले आहेत. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे आक्षेप असतात, असे विभागीय सचिवांनी विदित केले. जे प्रशासकीय असतील ते वेगळे ठेवा. परंतु ज्यामध्ये विभागाला मोठया प्रमाणात शासन निधीची वसुली करता येते त्याबाबत कार्यवाही झाली पाहिजे. समितीने नागपूर येथील परिच्छेद वाचला आहे. तेथे ७ कोटी रुपये वसुली करणे बाकी आहेत. विभाग म्हणतो की, बस विकून स्क्रॅपमधून पैसे देवू. परंतु २०० भंगार गाड्या विकून ७ कोटी मिळणार किंवा कसे याबाबतही समितीला शंका आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, सदरहू परिच्छेद वेगळा आहे. जर त्याबाबतची माहितीही याच परिच्छेदाच्या अनुषंगाने सांगावयाची असेल तर ती विभाग सांगू शकतो, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

समितीने केवळ एक उदहरण दिलेले आहे. या विषयाबाबत अनेक आक्षेप प्रलंबित आहेत. सन २०१५-१९ या कालावधीमध्ये या आक्षेपांकडे अधिक गांभीर्याने लक्ष देण्यात आलेले नाही. या विषयाकडे गांभीर्याने लक्ष न देण्याची कारणे काय आहेत ? अशी पृच्छा समितीने केली असता, सदरहू परिच्छेद हे महालेखाकार कार्यालयाने काढलेले नाहीत. विभागाकडून होणा-या अंतर्गत लेखापरिक्षणाचे ते आक्षेप आहेत, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

विभागाचे लेखापरिक्षण करतेवेळी कमी अर्थवसुली झाली असेल तर ती लक्षात आली असेल, ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, सन २०१४-१५ मध्ये शासनाने ४,७१४ कोटी रुपयांच्या वसुलीचे उद्दिष्ट दिलेले होते. त्याऐवजी विभागाने ५,३८२ कोटी रुपयांची वसुली केलेली आहे. परिवहन विभागाची एक खासियत अशी आहे की, शासनाने वसुलीसाठी जे उद्दिष्ट ठरवून दिले आहे त्यापेक्षा अधिक वसुली दरवर्षी झालेली आहे. यामुळे शासनाकडून दरवर्षी १० ते १५ टक्क्यांनी वसुलीचे उद्दिष्ट वाढवून दिले जाते. सन २०१८-१९ या वर्षी विभागाचे ८ हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट होते. उद्दिष्टापैकी अधिक वसुली विभागाकडून झालेली आहे. विभागाला गाड्यांच्या रजिस्ट्रेशनच्या माध्यमातून अधिक रक्कम मिळत असते. परंतु मोठ्या प्रमाणात गाड्यांचे रजिस्ट्रेशन होत नाही. त्यामुळे विभाग दंड आकारणी करीत असते. तसेच विभागाकडे व्हॉलेंटरी पेमेंटशिवाय पर्याय नसतो. महाराष्ट्रामध्ये सध्या ३.५ कोटी गाड्यांची नोंदणी झालेली आहे. सन १९९५ पर्यंत जवळपास ७० ते ८० लाख गाड्या होत्या. या सर्व गाड्यांची स्थिती अतिशय खराब झाली असणार. असे असताना विभागाकडे गाड्यांचे डि-रजिस्ट्रेशन करण्यासाठी लोक येत नाहीत. जर गाडी अतिशय खराब अवस्थेत असेल तर ती गाडी लोकांकडून भंगारमध्ये विकण्यात येते. विभाग प्रत्येक गाडीला १५ वर्षे झाल्यानंतर पर्यावरण कर म्हणजेच कार्बन टॅक्स आकारतो. परंतु अशा प्रकारचा टॅक्स भरण्यासाठी कोणतीही व्यक्ती येत नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीकडे जाऊन हा कर वसूल करणे विभागाला शक्य देखील होणार नाही. याचे मूळ कारण असे की, जुनी झालेली गाडी लोक चालवित नाहीत. जर ती रोडवर चालत असेल तर त्या व्यक्तीकडून कर वसूल करता येतो. अशा प्रकारच्या गाड्या पोलीस स्टेशन, आर.टी.ओ. कार्यालयामध्ये देखील पडून असतात. याचे कारण असे की, त्यासाठी वसूल करण्यात येणारा कर जवळपास १५ ते २० हजार रुपये असल्यामुळे लोक भंगार गाडीसाठी एवढ्या प्रमाणात पैसे भरण्यासाठी उत्सूक राहत नाहीत, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

अशा गाड्या नष्ट करण्याची पद्धत आहे काय ? अशी पृच्छा समितीने केली असता, यापूर्वी अशा प्रकारची पद्धत नव्हती. एप्रिल व मे महिन्यामध्ये केंद्र शासनाने असे नोटीफिकेशन काढले आहे की, गाड्यांचे डि-रजिस्ट्रेशन (नोंदणी रद्द) करण्यासाठी एक प्रोसिजर (पद्धत) तयार करण्यात यावी, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

गाड्या डिस्पोझ ऑफ (निर्लेखित) कशा प्रकारे करता येतील, अशी पृच्छा समितीने केली असता, महिंद्रा कंपनीने विनंती केली आहे की, अशा प्रकारच्या गाड्या नष्ट करण्यासाठी परवाना देण्यात यावा. परंतु यामध्ये दोन ते तीन गोष्टी आहेत. स्क्रॅप केलेल्या गाडयांचा टेरेरिस्टसाठी (अतिरेकी कारवाईसाठी) उपयोग होऊ शकतो. गाडी डि-रजिस्टर केल्यानंतर तिचा गैरवापर होऊ शकतो, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

गाड्यांचे डिस्पोझ ऑफ होईल. गाडी आहे तशीच ठेवण्यात येईल, असे मत समितीने मांडले असता, गाडी स्क्रॅप करण्यासाठी इन्स्टिट्युन्शनल सिस्टिम नाही. भंगार गोळा करणारा व्यक्ती गाडी घेऊन जातो. यासाठी कोणतीही यंत्रणा नाही की, ज्यावर शासनाचा वचक राहिल. कारण भंगार गोळा करणारे व्यक्ती जुन्या गाड्यांना ५ ते १० हजार रुपये देऊन विकत घेतात. गाडी सुरुवातीला डि-रजिस्टर झाली पाहिजे आणि त्यानंतर त्या गाडीचे स्क्रॅपिंग झाले पाहिजे, अशा प्रकारचा नियम आहे. परंतु आतापर्यंत कोणीही गाड्यांच्या डि-रजिस्ट्रेशनची प्रोसेस केलेली नसेल. याचे कारण लोक यासाठी उदासिन असल्याचे दिसून येते. जर गाडी डि-रजिस्टर करावयाची असेल तर त्यासाठी जुने सर्व टॅक्स भरावे लागतील. परंतु जुन्या गाडी भंगारमध्ये विकली तरी टॅक्स भरण्याएवढे पैसे मिळत नाहीत. त्यामुळे ते गाड्या डि-रजिस्टर करीत नाहीत. अशा प्रकारच्या गाड्या जप्त करण्याशिवाय विभागाकडे दुसरा पर्याय नाही. नियमानुसार व्यक्तीवर विभागाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई करता येत नाही, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

याबाबत शासनाकडून कधीपर्यंत धोरण तयार करण्यात येणार ? अशी विचारणा समितीने केली असता, अशा प्रकारचे धोरण सेंट्रल मोटर ॲक्टनुसार करता येते. रजिस्ट्रेशन आणि डि-रजिस्ट्रेशनबाबत राज्य शासनाकडे कोणतेही अधिकार नाहीत. याबाबतचे ड्राफ्ट नोटिफिकेशन काढलेले आहे. त्यासाठी सूचना आणि हरकती मागवून त्यानंतर ते अंतिम होत असते. मोटर व्हेईकल ॲक्टमध्ये राज्य शासनाला कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करता येत नाही, असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

मध्यंतरी मंत्री महोदयांनी घोषणा केली होती की, याबाबत राज्य सरकारला अधिकार आहे आणि तशा प्रकारचे धोरण तयार करून ते केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल, हि बाब समितीने निदर्शनास आणली असता, याबाबत विभागाचे ॲक्ट (कायदा) आणि रुल्स (नियम) तयार करून पाठविले होते, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

मध्यंतरी शासनाने अडीच हजार कोटी रुपये मिळण्याच्या उद्देशाने वन टाईम प्रिमियमचा कायदा मंजूर केला होता. तो केंद्र शासनाने मंजूर केलेला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सदरहू कायद्याला माननीय राष्ट्रपतींची मान्यता मिळालेली नाही. केंद्र शासनाच्या रोड ट्रान्सपोर्ट अँड हायवे (रस्ते व महामार्ग वाहतूक) मंत्रालय यांनी आक्षेप घेतलेले होते. केंद्र शासन याबाबत नियम तयार करीत असून त्याप्रमाणेच राज्य सरकारने कार्यवाही करावी, असे सांगितले आहे. तसेच समिती जो अडीच हजार कोटी रुपयांचा टॅक्स मिळण्याबाबतचा कायदा सांगत आहे त्याबाबत तो जी.एस.टी. मध्ये जो बदल केला आहे त्यानुसार वन टाईम टॅक्स घेता येतो, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

त्या कायद्याची अंमलबजावणी झालेली आहे किंवा नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, त्या कायद्याची अंमलबजावणी होत आहे. त्याचप्रमाणे त्यातून मोटर व्हेईकलचे पैसे राज्य सरकारला मिळत आहेत, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाचे महालेखाकार कार्यालयाकडील आणि विभागाच्या अंतर्गत लेखापरिक्षणाचे अनेक परिच्छेद प्रलंबित आहेत, या सर्व परिच्छेदांवर कधीपर्यंत निर्णय घेण्यात येणार ? अशी विचारणा समितीने केली असता, हे सर्व परिच्छेद अंतर्गत लेखापरिक्षणामुळे प्रलंबित असून ते महालेखाकार कार्यालयाकडील नाहीत, असे विभागीय सचिवांनी विदित केले. ८० टक्के परिच्छेद निकाली काढण्यात आलेली आहेत. ४५४ परिच्छेदांपैकी ३६२ परिच्छेद, ३३२ पैकी २५८ परिच्छेद, १७७१ परिच्छेदांपैकी ८०६ परिच्छेद निकाली काढलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

हे सर्व मागील परिच्छेद आहेत. परंतु जे परिच्छेद अजूनही प्रलंबित आहेत त्याबद्दल विचारणा करण्यात येत आहे. सन २०१५ नंतर हे सर्व परिच्छेद अधिक कार्यक्षमतेने निकाली काढण्यात आलेले नाहीत, अशी पृच्छा समितीने केली असता, प्रलंबित असलेले सर्व परिच्छेद निकाली काढण्यासाठी विभागामार्फत प्रत्येक कार्यालयामध्ये एक समिती स्थापन करण्यात येईल व पुढील सहा महिन्यांमध्ये सर्व परिच्छेद निकाली काढण्यात येतील, असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

**परिच्छेद क्र. ५.३ लेखापरीक्षेचे परिणाम :—**

या परिच्छेदामध्ये ७५ कोटी रुपयांपैकी २७.०९ कोटी रुपयांची वसुली शिल्लक आहे. सदरहू वसुलीबाबतची सद्यःस्थिती काय आहे ? अशी पृच्छा समितीने केली असता, २७.०९ कोटी रुपयांच्या वसुलीमध्ये नागपूर आर.टी.ओ. कार्यालयाकडून २४.३४ कोटी रुपयांची वसुली शिल्लक आहे, असा महालेखाकार यांचा आक्षेप आहे. परंतु त्यांनी आक्षेप काढत असताना गाड्यांना मल्टीप्लाय केलेले आहे. परंतु विभाग सांगू इच्छितो की, तशा प्रकारचे टॅक्स कलेक्शन केले जात नाहीत. काही टॅक्स हे वन टाईम असतात. म्हणून गोंदिया आर.टी.ओ. कार्यालयाची वसुली देखील २० कोटी रुपये असल्याचा महालेखाकार कार्यालयाकडून आक्षेप काढला होता. परंतु २० कोटी रुपयांचा आक्षेप महालेखाकार कार्यालयाच्या मान्यतेने निर्लेखित करण्यात आलेला आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

याचा अर्थ २७ कोटी रुपयांपैकी केवळ ७ कोटी रुपये शिल्लक आहेत काय ? अशी समितीने विचारणा केली असता, एकूण ७५ कोटी रुपयांपैकी २७.९७ कोटी रुपये वसूल केले आहेत. २० कोटी रुपये निर्लेखित करण्यात आलेले आहेत आणि २७.०९ कोटी रुपये वसूल होणे शिल्लक आहे. २७.०९ कोटी रुपयांपैकी २४.३४ कोटी रुपये नागपूर आर.टी.ओ. कार्यालयाकडून वसूल होणे शिल्लक आहे. यामध्ये जुन्या गाड्यांवर आकारण्यात येणारा १० कोटी रुपयांचा पर्यवारण कर आहे. तसेच, ४ कोटी २४ लाख रुपयांचा प्रोफेशन टॅक्स आहे आणि फिटनेस + फी असा एकूण जवळपास १० कोटी रुपयांचा कर वसूल होणे शिल्लक आहे. परंतु जर गाडी रस्त्यावर चालत नसेल तर फिटनेस फी लोकांकडून भरल्या जात नाही. या सर्व गोष्टी परिच्छेदाचा अभ्यास करीत असताना विभागाच्या निदर्शनास आलेल्या आहेत. तरी देखील हा परिच्छेद महालेखाकार कार्यालयास पुन्हा दाखविता येईल. आवश्यकता भासल्यास सदरहू परिच्छेद प्रलंबित ठेवण्यात यावा, अशी विभागाची विनंती आहे. कारण २७ कोटी रुपयांपैकी अधिक रक्कम निर्लेखित होण्यासाठी महालेखाकार कार्यालयाकडून मान्यता मिळावी, अशी अपेक्षा आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

इन्हवायरमेंट टॅक्स वसूल करण्यासाठी विभागाकडे कोणती यंत्रणा अस्तित्त्वात आलेली आहे ? शासनाने यासाठी कायदा केलेला आहे. परंतु हा कर वसूल करण्यासाठी विभागाकडे यंत्रणा निर्माण केलेली आहे काय ? अशी पृच्छा समितीने केली असता, मुळात १५ वर्षे गाडी चालू शकत नाही. तसेच पर्यावरण कर हा वाहनाचे आयुष्य १५ वर्षे झाल्यानंतर घेतला जातो, अशी विचारणा समितीने केली असता, कायदा तयार करण्यामागे दोन मुख्य उद्देश आहेत. पहिला असा की, लोकांनी जुनी झालेली वाहने चालवू नयेत. वाहन जर १५ वर्षांपेक्षा अधिक काळाचे असेल तर हा कर वसूल केला जातो. तसेच व्यवसायिक वाहन जसे की, ट्रक, टॅक्सी या वाहनांसाठी ८ वर्षांनंतर पर्यावरण कर आकारला जातो. व्यवसायिक वाहने आठ वर्षेपर्यंत चालविण्याच्या स्थितीत नसतात. त्यामुळे महालेखाकार कार्यालयाने यामध्ये वाहनांच्या संख्येला टॅक्स मल्टीप्लाय करून ही आकडेवारी काढलेली आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

नागपूर महालेखाकार कार्यालयास परिवहन विभागाने सदरहू परिच्छेदाची उत्तरे देऊन सदरहू परिच्छेद निरसित करण्यात आला आहे काय ? अशी विचारणा प्रधान महालेखाकार यांनी केली असता, परिच्छेद निरसित करण्यात आला नसल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

नागपूर आर.टी.ओ. कार्यालयाकडील २० कोटी रुपयांचा आक्षेप निरसित करण्यात आला आहे काय ? अशी पृच्छा प्रधान महालेखाकार यांनी केली असता, सदर २० कोटी रुपयांचा आक्षेप निरसित केला आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

सदरहू २० कोटी रुपये निर्लेखित केल्यानंतर अद्यापही २७ कोटी रुपये शिल्लक आहेत, हि बाब समितीने निदर्शनास आणली असता, त्यापैकी २४ कोटी रुपये नागपूर आर.टी.ओ. कार्यालयाचे आहेत, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

त्यापैकी सर्व रक्कम निर्लेखित होणार काय ? अशी विचारणा समितीने केली असता, महालेखाकार कार्यालयाने वेगवेगळ्या कार्यालयामधील गाड्यांची संख्या घेतली. गोंदिया जिल्ह्यातील संपूर्ण आक्षेप निर्लेखित करण्यात आले आहेत, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

फिटनेस फी वसूल होणे शक्य नाही. परंतु इतर वसुली होऊ शकते, असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी सदर बाब मान्य केली. जर १५ वर्षांनंतर वाहन चालविण्यायोग्य राहत नसेल तर पर्यावरण कर देखील भरण्यासाठी लोक येत नाहीत. तसेच प्रोफेशन टॅक्सबाबत महालेखाकार कार्यालयाने वाहनांसोबत मल्टीफिकेशन केले आहे. या टॅक्सचा भरणा लोकांकडून केला जातो. एका व्यक्तीकडे जर दोन वाहने असतील त्याला एकवेळेस प्रोफेशन टॅक्स भरावा लागतो. हा कर वाहनानुसार नसतो. परंतु तो टॅक्स वाहनांच्या संख्येसोबत मल्टीप्लाय करून काढण्यात आलेला आहे. त्यामुळे याबाबत चर्चा करून ही रक्कम देखील निर्लेखित करता येईल, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

व्यवसायिक वाहन विशिष्ट वर्षानंतर वापरता येणार नाही, अशा प्रकारचा कायदा अस्तित्वात नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, जर वाहन सुस्थितीत असेल तर त्यावर केवळ कर वाढविता येऊ शकतो, असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

नागपूर आर.टी.ओ. कार्यालयाकडील २४ कोटी रुपयांचा जो आक्षेप आहे तो आक्षेप महालेखाकार कार्यालयासोबत चर्चा करून निर्लेखित करण्यात यावा व याबाबतचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत देण्यात यावा असे सूचित करून हेव्ही व्हेईकलचा (जड वाहनांचा) कर वाढविलेला आहे काय ? त्यासंदर्भातील कायदा राज्यसभेमध्ये मंजूर झाला आहे काय ? हेव्ही व्हेईकल (जड वाहन) नॉन पार्किंगच्या ठिकाणी पार्किंग केली असेल तर त्यासाठी जो दंड आकारणीचा दर आहे तो केवळ १०० रुपये एवढा आहे. त्यासंदर्भातील विधेयकही मंजूर झालेले आहे काय ? अशी पृच्छा समितीने केली असता, राज्यसभेमध्ये सत्ताधारी पक्षाचे संख्याबळ अधिक झाल्यानंतर ते संमत होईल, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

ऑटो रिक्षाला क्युआर कोड बसविण्यासंदर्भात मंत्री महोदयांनी घोषणा केलेली होती. त्याबाबत सद्य:स्थिती काय आहे, अशी विचारणा समितीने केली असता, ही बाब वाहतूक पोलिसांनी करावयाची होती, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

रिक्षाच्या आतमध्ये रिक्षा चालकाचे परमिट आणि वाहन चालकाचा फोटो दर्शनी भागावर लावण्यात आला आहे. क्युआर कोड रिक्षाच्या गॅस टाकीवर लावण्यात येणार होते. याबाबतची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. ज्यावेळी गॅस सिलिंडर भरण्यात येते त्यावेळी क्युआर

कोडवरून ते पडताळले जाते आणि त्यानंतर गॅस सिलिंडर भरण्यात येतो. तीन वर्षानंतर पुन्हा रिक्षा चालकाला ते पडताळून घ्यावे लागत असते, असे परिवहन आयुक्तांनी विदित केले.

क्युआर कोड म्हणजे काय ? अशी पृच्छा समितीने केली असता, क्युआर कोडमध्ये समोरचा व्यक्ती मशिनद्वारे क्युआर कोड दिलेल्या व्यक्तीची माहिती व ज्या वस्तुसाठी ते वापरण्यात आलेले आहे त्याची माहिती छापलेली असते. त्यामध्ये त्या व्यक्तीचा फोटो आणि नंबर देखील टाकता येतो, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

सीएनजीसाठी क्युआर कोड अनिवार्य करण्यात आलेले आहे काय ? अशी पृच्छा समितीने केली असता, महानगर गॅसमार्फत तो जो कोड दिला जातो तो टॅली करून बघावा लागतो. कारण सीएनजीच्या गॅसची टाकी दर तीन वर्षानंतर टेस्टींग करून घ्यावी लागत असते. त्यानंतरच तो कोड दिला जातो. त्याबाबतची अंमलबजावणी ब-यापैकी सुरू आहे, असे परिवहन आयुक्तांनी विदित केले.

क्युआर कोड बसविण्यामागील उद्दिष्ट काय आहे ? अशी पृच्छा समितीने केली असता, सीएनजीचा अयोग्य किंवा गैरवापर करण्यात येऊ नये म्हणून तो लावण्यात येतो. या क्युआर कोडची मोबाईलवरुनही पडताळणी करता येते, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

एकेका व्यक्तीकडे अनेक रिक्षा असल्याचे दिसून येते, हि बाब समितीने निदर्शनास आणली असता, जरी एका व्यक्तीकडे अनेक रिक्षा असले तरी त्या व्यक्तीला एक व्यक्ती म्हणून प्रोफेशन टॅक्स द्यावा लागतो. परंतु या प्रकरणामध्ये महालेखाकार कार्यालयाने एकूण गाड्यांच्या संख्येला मल्टीप्लाय करून आकडेवारी काढलेली आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

राज्यातील मेगा भरतीमध्ये परिवहन विभागाची पदभरती निघणार आहे काय ? विभागाला किती पदांची आवश्यकता होती ? अशी पृच्छा समितीने केली असता, ८३२ पदांची आवश्यकता होती, त्यानुसार ८३२ उमेदवारांची पदभरती विभागाकडून करण्यात आलेली आहे. त्या पद भरतीसंदर्भात उच्च न्यायालयामध्ये प्रकरण गेले आहे. त्याचप्रमाणे काही उमेदवारांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रकरण दाखल केले आहे. त्यामुळे त्या पदभरतीवर स्थगिती देण्यात आलेली आहे. ती स्थगिती उठविल्यानंतर ८३२ पदांची भरती तात्काळ होईल. कारण याबाबत एम.पी.एस.सी. कडून उमेदवारांची यादी प्राप्त झालेली आहे. यामध्ये केवळ सेवाप्रवेश नियमासंदर्भात प्रकरण सुरू आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

**परिच्छेद क्रमांक ५.४ लेखापरीक्षा अभिक्षणेः**

**परिच्छेद क्रमांक ५.४.१ प्रवासी कराची वसुली न करणे :—**

सदरहू परिच्छेदाबद्दल माहिती देण्यात यावी, असे समितीने निदेशित केले असता, या परिच्छेदामधील विषय हा नागपूर, पुणे, नाशिक या सर्व ठिकाणचा आहे. नागपूर महानगरपालिकेने त्यांच्या स्तरावर खाजगी व्यक्तीसोबत करार केलेला आहे. महानगरपालिकेने प्रवासी कर वसूल करावा आणि तो कर शासनाकडे जमा करावा, अशा प्रकारचे आदेश देण्यात आलेले आहेत. हा कर महानगरपालिकेच्या करामधून जमा करावा लागत असतो. हा कर जमा झालेला आहे, ही बाब सत्य आहे. परंतु नागपूर महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांनी तो कधीच भरलेला नाही. राज्यातील पुणे, नागपूर, नाशिक, यासारख्या अनेक महानगरपालिकांनी तो भरलेला नाही. प्रत्येक तिकिटावर १५ पैसे कर वसूल केला जातो. या प्रकरणामध्ये नागपूर महानगरपालिकेने खाजगी ऑपरेटर लावलेला आहे. विभाग महानगरपालिकेकडून हा कर वसूल करणार. शासनाने महानगरपालिकेला गाडी चालविण्याचे परमिट दिले आहे. महानगरपालिकेने शासनाचे हे परमिट खाजगी व्यक्तीला देऊन गाडी चालू केली आहे. ज्या ज्या ठिकाणी अशा गाड्या बंद करण्याचे आदेश दिले जातात त्यावेळी महानगरपालिकेची वाहने बंद होणार, अशा प्रकारच्या बातम्या येतात. त्यामुळे लगेच हा आदेश मागे घ्यावा लागतो. नागपूर महानगरपालिकेने राज्य शासनाकडे असा प्रस्ताव दिलेला आहे की, ज्यावेळी ही वाहतूक सेवा सुरू करण्यात आली त्यापूर्वी त्या ठिकाणी एमएसआरटीसीची (महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ) सेवा सुरू होती. ती सेवा सुरू असताना त्या सेवेमधून प्रवास करणा-या व्यक्तींना विविध सवलतीच्या दरात प्रवासामध्ये सूट दिली जाते. परंतु नागपूर महानगरपालिकेला शासनाकडून ७५ कोटी रुपये येणे असल्यामुळे ही वसुली करु नये, अशा प्रकारचा प्रस्ताव दिलेला आहे. All Municipal Transport Services are in great losses across the State and they are very sensitive, we cannot close it. त्यामुळे या करांची वसुली करण्याची विभागाची इच्छा असली तरी ती वसुली करता येत नाही. त्यामुळे विभागाला असे वाटते की, सदरहू परिच्छेद निर्लेखित होऊ शकेल, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभाग आता जी माहिती सांगत आहे आणि जी माहिती विभागाने लेखी स्वरुपात दिली आहे त्यामध्ये तफावत आढळून येत आहे, असा मुद्दा समितीने मांडला असता, वाहने विकल्यानंतर अधिक रक्कम मिळणार नाही, असे विभागाला लेखी सांगता येणार नाही, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

महालेखाकारांनी काढलेले परिच्छेद निर्लेखित करण्याचा प्रस्ताव विभागाने दिलेला नाही, हि बाब समितीने निदर्शनास आणली असता, पूर्ण पैसे मिळाले तर निर्लेखनाचा प्रस्ताव तयार करावा लागणार नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नागपूर महानगरपालिकेची ही सेवा अजूनही सुरू आहे काय ? अशी पृच्छा समितीने केली असता, नाही. आता वेगळी सेवा सुरू आहे. पुर्वीची सेवा खाजगी कंत्राटदाराकडून सुरू होती. आता एनएमसीमार्फत (नागपूर महानगरपालिका) मार्फत सुरू आहे. असे असतानाही अजूनही त्यांच्याकडून कर भरला जात नाही, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

Are they not paying tax as on today? अशी विचारणा समितीने केली असता, हे मान्य आहे की, सन २००७ पासून प्रवासी कर आणि बाल पोषण अधिभार भरण्यात आलेला नाही. यामध्ये फक्त सात लाख रुपये भरण्यात आलेले आहेत. सन २००७ मध्ये एस.टी. कडून सदरहू वाहतूक महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आलेली आहे. सन २००७ ते सन २०१६ या कालावधीमध्ये कार्यरत असलेल्या जुन्या ऑपरेटरला टर्मिनेट करण्यात आले आहे. त्यानंतर माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वाहतूक सुरू केली. वाहतुकीमध्ये मोठ्या प्रमाणावर तोटा होत असल्यामुळे १०० गाड्या आलेल्या होत्या. जुन्या ऑपरेटला टर्मिनेट केल्यानंतर नवीन मल्टीपल ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आली. रेव्हेन्यू रिस्क महानगरपालिकेची आहे. दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ पर्यंतचा सर्व महसूल प्रायव्हेट कंपनीकडे जात होता. त्या कंपनीवर थकीत रक्कम असल्यामुळे आर्बिट्रेशनची केस आहे. त्यामध्ये प्रवासी कर, बाल पोषण अधिभार आणि शास्ती या सर्वांचा क्लेम केलेला आहे. सदरहू केस अंतिम टप्प्यात आलेली आहे. संबंधित खाजगी कंपनीच्या शिल्लक राहिलेल्या रकमेचा हा विषय आहे. दुसरा विषय असा आहे की, महानगरपालिकेने वाहतूक सुरू केल्यानंतर सुरुवातीच्या काळामध्ये रिकव्हरी कमी होत असल्यामुळे ऑपरेटरचे पेमेंट करण्यासाठी देखील पैसा कमी पडत होता. सुरुवातीच्या काळामध्ये अंदाजे ३८ टक्के रिकव्हरी होत होती. परंतु तीच रिकव्हरी आता ५४ ते ५५ टक्के होत आहे. त्यामुळे चालू आर्थिक वर्षाचा कर भरण्याची तयारी सुरू केलेली आहे. उर्वरित प्रलंबित रक्कम डिसेंबर, २०२० पर्यंत भरण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. आर्थिक स्थिती प्रतिकूल असल्यामुळे यापूर्वी कर भरु शकलो नाही. आर.टी.ओ.चा अंदाजे ७ कोटीचा मालमत्ता कर महानगरपालिकेकडे जमा आहे. तो कर समायोजित करण्याचा विभाग प्रयत्न करेल, असे नागपूर महानगरपालिकेचे प्रतिनिधी यांनी विदित केले.

सदरहू कर समायोजित करण्यासाठी काय अडचण आहे? अशी पृच्छा समितीने केली असता, वित्त विभागाने परवानगी दिली तर सदरहू कर समायोजित करता येईल. कारण हा विषय नगरविकास आणि परिवहन विभागाचा आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

परिवहन विभागाचे पैसे देण्यास महानगरपालिका तयार आहे. परिवहन विभागाने मालमत्ता कर द्यावा, अशी त्यांची मागणी आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, महानगरपालिकेने मालमत्ता करांची मागणी करावी, परिवहन विभाग पैसे देण्यास तयार आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

You settle it together, असे समितीने सूचित केले असता, these are two different paras. If our Department is not paying property tax, then we will be responsible for it, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

मालमत्ता कर त्याच्याकडे येणे आहे, असे महानगरपालिकेचे अधिकारी म्हणत आहेत. परिवहन विभागाने महानगरपालिकेचा कर भरावा ते पण त्याचा कर देतील असे महानगरपालिकेचे अधिकारी लोकलेखा समितीसमोर सांगत आहेत. त्यांनी जे सांगितले आहे ते सर्व रेकॉर्डवर आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, सदरहू करांचे समायोजन करून सदर अहवाल समितीला सादर करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

परिवहन विभाग सदरहू कराचे समायोजन करून नियमित कर भरण्यासाठी तयार आहे. सन २०१७ नंतर जो व्यवहार महानगरपालिकेकडे आला त्यानंतरचा सर्व कर महापालिकेने भरणे आवश्यक आहे, असे समितीने सूचित केले असता, करापोटी भरावयाची रक्कम जवळपास ५.५० कोटी रुपयांची आहे. तो कर भरण्याचा महनगरपालिका प्रयत्न करेल, असे नागपूर महानगरपालिकेच्या प्रतिनिधीनी विदित केले.

सन २०१७ पूर्वीचे ७ कोटी व त्यानंतरचे ५.५० कोटी अशी १२.५० कोटी रुपयांचा कर महानगरपालिकेकडे प्रलंबित आहे. एवढी मोठी रक्कम शिल्लक असताना देखील महानगरपालिका सदरहू कराचे समायोजन करण्याचे सांगत आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, समायोजनाबाबतचा विषय काढण्याचे एवढेच कारण की, मागील आठ दिवसांपूर्वी करासंदर्भात एक बैठक झाली होती तेव्हा ७ कोटी ११ लाख रुपये जमा आहेत, असे नागपूर महानगरपालिकेच्या प्रतिनिधीनी विदित केले.

परिवहन विभाग सदरहू कराचे समायोजन करण्यासाठी तयार आहे, हि बाब समितीने निदर्शनास आणली असता, परिवहन विभाग सदरहू कराचे तत्काळ समायोजन करण्यासाठी तयार आहे. तसा अहवाल देखील समितीला सादर करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

महानगरपालिकेने नियमित कर भरणे आवश्यक आहे, अशी सूचना समितीने केली असता, चालू आर्थिक वर्षापासून नियमित कर भरण्यात येईल, असे महानगरपालिकेच्या प्रतिनिधीनी विदित केले.

चालू आर्थिक वर्षापासून नाही तर सन २०१७ पासून प्रलंबित असलेला सर्व कर भरण्यात यावा, असे निर्देश समितीने दिले असता, महानगरपालिकेच्या प्रतिनिधीनी त्यास सहमती दर्शविली.

**परिच्छेद क्रमांक ५.४.२ मोटार वाहन कराची वसूली न करणे:**

सदरहू परिच्छेदाच्या अंतर्गत ४२ लाख रुपयांची वसुली होणे शिल्लक आहे, असा मुद्दा समितीने मांडला असता, त्या गाड्या व्यवस्थित चालत नसल्यामुळे वसुली करणे कठीण जात आहे. तरी देखील गाडी किंवा माणूस सापडल्यानंतर त्यांच्याकडून सदर वसुली करण्याचा विभाग प्रयत्न करीत आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

त्यांचे कॅल्क्युलेशन चुकीचे असू शकेल. You can do it on your level, असे निर्देश समितीने दिले असता, जेव्हा विभागासमोर परिच्छेद येतो त्यावेळी तो कसा तरी कलेक्ट करण्याचा विभाग प्रयत्न करतो. परंतु जेव्हा कलेक्शन करतो तेव्हा यामध्ये काय अडचण आहे ते कळून येते. खरे पाहता एकूण सदर रक्कम एक कोटी रुपयांपेक्षा कमी आहे. त्यापैकी ५० ते ६० लाख रुपये भरलेले आहेत. उर्वरित ४० लाख रुपये भरण्यात येतील, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

सदरहू अकाउंट सेटल करून जे विभागास निर्लेखित करावयाचे आहे ते करण्यात यावे पण सन २०१५ चे परिच्छेद संपले पाहिजेत, असे निर्देश समितीने दिले.

सदरहू परिच्छेद हे परिवहन विभागाच्या रेकॉर्डवरुनच काढलेले आहेत. त्यामुळे सदर परिच्छेदास विभागाने वेळोवेळी उत्तर देणे आवश्यक आहे, असे मत प्रधान महालेखाकार यांनी व्यक्त केले असता, प्रधान महालेखाकार म्हणत आहेत ते बरोबर आहे. परंतु परिच्छेद आल्यानंतरच त्यावर अभ्यास सुरू केला जातो, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**परिच्छेद क्रमांक ५.१ ''कर प्रशासन''**

**परिच्छेद क्रमांक ५.२ ''अंतर्गत लेखापरीक्षा''**

**अभिप्राय :**

**३.१** प्रत्येक प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये एक अंतर्गत लेखापरिक्षा शाखा असते जिच्या प्रमुखपदी लेखा अधिकारी असतात. दिनांक १ सप्टेंबर, १९७१ च्या आदेशात लेखापरिक्षा करण्यासाठीचे निकष नमूद केले आहेत. ज्यामध्ये नव्याने नोंदणी झालेल्या वाहनांचे कर निर्धारण तपासणी, रोखपुस्तिका जड वस्तु इत्यादीची तपासणी विहित केली आहे, परंतु लेखापरीक्षासाठी नियोजित केलेले युनिटस आणि प्रत्यक्षात लेखापरिक्षा केलेल्या युनिटसवरुन दिसुन येते की, नियोजित युनिटसची संख्या आणि लेखापरीक्षा केलेल्या युनिटसची संख्या २०१३-१४ मधील ३२ वरुन कमी होऊन २०१४-१५ मध्ये दोन इतकी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले.

यासंदर्भात समितीने विचारणा केली असता सदर माहिती जानेवारी २०१५ मध्ये सादर करण्यात आली होती. त्यामध्ये सन २०१४-१५ च्या फक्त २ कार्यालयांची माहिती कळविली होती. उर्वरित कार्यालयाची माहिती वर्ष संपणे बाकी असल्याने अप्राप्त होती. त्यामुळे नियोजित युनिट्सची संख्या २ दिसून येत असून सन २०१४-१५ मध्ये एकूण ४६ युनिट्सचे लेखापरिक्षण झालेले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांचे लेखा परिक्षण करताना दर दिवशी किती युनिटसची तपासणी करणे आवश्यक आहे याबाबत सुचना दिल्या नसुन १० मोटार वाहनांपैकी ८ वाहनांची फेर तपासणी (Reverse checking) करणे,मोटार वाहन कायद्यानुसार जमा झालेल्या ५ टक्के फी ची तपासणी करणे, BMV SEO 4 Points तपासणी करणे, जड वस्तू संग्रहाची तपासणी करणे, धनादेश, मनी ऑर्डर यांमधुन जमा झालेल्या रक्कमाचे cross verification करणे इत्यादी बाबीचे लेखापरीक्षण करणेबाबत नमूद केले आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी त्यांच्या आधिनस्त असलेल्या उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांचे सन २०१४-१५ मध्ये केलेल्या लेखा परिक्षणात एकूण ३४२० आक्षेप उपस्थित केले असुन आक्षेपित रक्कम रु.३,३६,६३,९७४ इतकी आहे. यापैकी ५८६ आक्षेपांचा निपटारा करण्यात आला असुन रु.३४,८४,४९० इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे. तसेच अद्याप २८३४ आक्षेप प्रलंबित असुन रु.३,०१,७९,४८४ इतकी रक्कमेची वसुली प्रलंबित असल्याचे समितीस सांगण्यात आले.

**शिफारशी :**

**३.२ (१) सदरहू परिच्छेदात अंतर्गत लेखापरिक्षणासंदर्भात प्रामुख्याने कराची कमी आकारणी करण्यात आल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. लेखापरिक्षण करण्याचा मुळ उद्देशच सर्व वित्तीय नियमांचे पूर्णपणे पालन व्हावे व तसे न झाल्यास संबंधितांना शासन व्हावे असा असताना अनेक ठिकाणी कराची आकारणी नियमानुसार केली गेली नाही. परिवहन विभागाकडून मोटार वाहन कर, वस्तु कर, प्रवासी कर इ. अनेक करांची वसुली करण्यात येत असून त्याअनुषंगाने विभागाला मोठ्या प्रमाणात महसूलाची प्राप्ती देखील होत असताना या सर्व अनियमितता विभागाच्या वेळेत लक्षात येणे अभिप्रेत व आवश्यक असताना या सर्व बाबी महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर विभागाच्या निदर्शनास येणे ही बाब अतिशय गंभीर, आक्षेपार्ह व वित्तीय शिस्तीचे उल्लंघन करणारी आहे. इतकेच नव्हेतर अंतर्गत लेखापरिक्षणात नियोजित केलेले युनिट्स व प्रत्यक्षात लेखापरिक्षा केलेल्या युनिटसच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येत असून निपटारा केलेल्या अभिक्षणांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहे. यातील जी प्रशासकीय स्वरुपाची अभिक्षणे असतील त्याची दखल विभागाने थोड्या विलंबाने घेतली तरी चालू शकते. परंतु ज्या अभिक्षणांमध्ये मोठ्या प्रमाणात शासकीय निधीच्या वसुलीचा अंतर्भाव असतो अशी अभिक्षणांची दखल विभागाने अत्यंत तातडीने घेवून त्यावर कार्यवाही करणे अभिप्रेत असताना विभागाने सर्व अभिक्षणे एकाच समांतर स्तरावर व कालमर्यादेत हाताळली. परिणामी कोट्यावधी रुपयांची वसुली यातून प्रलंबित राहिली. सन २०१०-१५ पर्यंत व त्यानंतरही सन २०१५-१९ या कालावधीमध्ये या आक्षेपांकडे अधिक गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता असतानाही त्याकडे विभागाने दुर्लक्ष केले. परिणामी आक्षेपांची संख्या मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिली. अशा गंभीर बाबींसंदर्भात जर लेखापरिक्षणातील अभिक्षणे प्रलंबित असताना विभागाने त्याची दखल वेळेत घेणे अत्यावश्यक ठरते. समितीने या प्रकरणाची सखोल तपासणी केली असता यातील ८० टक्के परिच्छेद निकाली काढण्यात आल्याचे समितीस सांगण्यात आले. महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे सन २०१४ च्या अगोदरचे आहेत. या अभिक्षणांची सद्य:स्थिती तपासल्यास या संख्येत अधिक मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. हे सर्व प्रलंबित आक्षेप कालबद्ध पद्धतीने निकाली काढण्यासाठी विभागामार्फत प्रत्येक कार्यालयामध्ये एक समिती स्थापन करण्यात येईल व पुढील ६ महिन्यांमध्ये सर्व परिच्छेद निकाली काढण्यात येतील असेही समितीस आश्वासित करण्यात आले. अतः हे सर्व प्रलंबित परिच्छेद कालबद्ध पद्धतीने तातडीने निकाली काढण्याच्या अनुषंगाने विभागाने यंत्रणा कार्यान्वित करावी व याअनुषंगाने करावयाची वसुली तातडीने वसुल करण्यात येवून या प्रकरणातील दोषी अधिकारी/कर्मचा-यावंर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३.३ (२) विभागाला वाहनांच्या नोंदणीतून व दंडाच्या आकारणीतून मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होत असतो. परंतु या वाहनांची नोंदणी व दंड आकारणी नियमानुसार न झाल्यास निश्चितच वसुलीमध्ये कमतरता येते. १५ वर्षापेक्षा जुन्या झालेल्या वाहनांची संख्या लाखोंच्या संख्येने असतानाही त्याची नोंदणी रद्द करण्यासाठी लोक स्वतःहून येत नाहीत व ती भंगारमध्ये विकण्यात येते. वाहनाला १५ वर्षे झाल्यानंतर त्यावर पर्यावरण कर म्हणजे कार्बन कर आकारण्यात येतो. परंतु अशी कोणतीही व्यक्ती स्वतःहून असा कर भरण्यास समोर येत नसल्यामुळे व्यक्तीशः पाठपुरावा करून हा कर वसुल करणे विभागाला शक्य होत नाही. अशी जुनी वाहने नष्ट करण्यासाठी केंद्र शासनाने अधिसूचना निर्गमित केलेली असून त्यात वाहनांची नोंदणी रद्द (D-Registration) करण्याची पद्धत तयार करण्याबाबत सांगण्यात आलेले आहे. सद्यःस्थितीत गाडी स्क्रॅप करण्याची कोणतीही परिपुर्ण व संस्थात्मक यंत्रणा (Institutional System) अस्तित्वात नाही, ज्यामुळे शासनाचा या बाबींवर वचक राहू शकेल. परंतु वाहनांची नोंदणी रद्द करण्याच्या प्रक्रियेची लोकांकडून अंमलबजावणी केली जात नसल्यामुळे त्यापुढील कार्यवाही करणे विभागाला शक्य होत नाही. समितीच्या असेही निदर्शनास आले की, सद्यःस्थितीत यासंदर्भात केंद्र व राज्य स्तरावर कोणतेही धोरण अस्तित्वात नाही. सेंट्रल मोटर ॲक्टनुसार यासंदर्भात धोरण ठरविण्याचे अधिकार राज्य शासनाला नाहीत. मात्र यासंदर्भात धोरण प्रस्तावित करून केंद्र शासनाकडे शिफारस करण्याचे अधिकार मात्र विभागाला असतानाही अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही विभागाच्या स्तरावरुन कालबद्ध पद्धतीने झाली नाही. अतः या गंभीर व महत्वाच्या विषयाबाबत राज्य शासनाने तातडीने पाऊल उचलावे. यासंदर्भात सुस्पष्ट धोरण तयार करून केंद्र शासनाशी योग्य तो समन्वय ठेऊन अथवा केंद्राकड तशी शिफारस करून या प्रकरणी तातडीने निर्णय होण्याच्या दृष्टीने योग्य तो पाठपुरावा करण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ५.३ "लेखापरीक्षेचे परिणाम"**

**अभिप्राय :**

**३.४** वर्ष २०१४-१५ मध्ये, महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम इत्यादिंशी संबंधित ४८ कार्यालयांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीतील २९९ अभिक्षणांत रु.७५.३१ कोटी अंतर्भूत रक्कमेचे न्यून कर निर्धारण आणि इतर अनियमितता आढळुन आल्या ज्या चुकीचे दर आकारल्यामुळे, कराची न/कमी आकारणी, चुकीची सुट दिल्यामुळे/वर्गीकरण यामुळे कराची कमी आकारणी तसेच अतिरिक्त परतावा आणि इतर इत्यादीमुळे झाली होती.

सन २०१४-१५ मध्ये परिवहन विभागाने मार्च, २०१५ पर्यंत प्रलंबित असलेल्या परिच्छेदांपैकी एकूण १६६ परिच्छेदांचे अनुपालन करून रू.३५.७२ कोटी वाहन कराचे न्यून निर्धारण, कमी आकारणी मान्य करून ती संपूर्ण रक्कम वसूल केली आहे. रू.३५.७२ कोटीमध्ये सन २०१४-१५ च्या अहवालातील २९९ प्रकरणांमधील २० परिच्छेदांची रू.१५.२८ लाख रक्कम समाविष्ट आहे. आतापर्यंत वर नमूद २९९ परिच्छेदांमधील रू.७५.३१ कोटीपैकी रू.२७.९७ कोटी वसुल झालेले असून रू.२०.२५ कोटी रकमेचे परिच्छेद महालेखाकार कार्यालयाने निर्लेखित केलेले आहेत. उर्वरीत रू.२७.०९ कोटीची वसूली बाकी असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

वसुलपात्र रकमांची वसुली तातडीने करण्यासाठी संबंधितांना आदेशित करण्यात आले आहे. तसेच वाहनाच्या थकीत कराबाबत प्राथम्याने मोहीम हाती घेऊन थकीत कर तातडीने वसुल करणेबाबत सुचना निर्गमित करणेत आल्या असल्याचे समितीस सांगण्यात आले.

**शिफारस :**

**३.५ लेखापरिक्षेचे परिणाम याअंतर्गत चुकीचे दर आकारल्यामुळे, चुकीची सुट दिल्यामुळे, अतिरिक्त परतावा इ. कारणास्तव कोट्यावधी रुपयांचे कर निर्धारण कमी होणे व इतर अनियमिततेसंदर्भात सदरहू परिच्छेदात आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. याअनुषंगाने २९९ अभिक्षणांमधून रु.७५.३१ कोटीपैकी रु.२७.९७ कोटी वसुल करण्यात आले, रु.२०.२५ कोटी महालेखाकारांच्या मान्यतेने निर्लेखित करण्यात आले व रु.२७.०९ कोटीची वसुली शिल्लक असल्याचे समितीस सांगण्यात आले. ज्यातील रु.२४.३४ कोटीची वसुली ही नागपूर आरटीओची आहे. ज्यात रु.१० कोटीचा पर्यावरण कर, रु.४.३४ कोटीचा व्यावसायिक कर आणि फिटनेस + फी रु.१० कोटी अशी एकूण रु.२४.३४ कोटी कराची वसुली होणे शिल्लक आहे. परंतु विभागाने या वसुलपात्र करनिश्चितीच्या पद्धतीवर आक्षेप नोंदविले व त्याआधारे ही वसुलपात्र रक्कम यापेक्षा कमी असल्याचे समितीस सांगितले. काही कर हे एकरकमी असतात. एखाद्या व्यक्तीकडे एकपेक्षा जास्त वाहने असतील तरीही त्या व्यक्तीला एक व्यक्ती म्हणूनच व्यावसायिक कर द्यावा लागतो. मात्र महालेखाकारांनी वाहनांच्या संख्येवरुन ही आकारणी केल्यामुळे वसुलपात्र रक्कम अधिकची दिसून येते. अन्य जिल्ह्यामध्ये देखील अशाप्रकारे कर आकारणी केली असता या आक्षेपांचे व त्यातील वसुलपात्र रकमेतून रु.२० कोटी महालेखाकार कार्यालयाच्या मान्यतेने निर्लेखन करण्यात आले. याचआधारे रु.२७.०९ कोटीची रक्कम देखील निर्लेखित करण्याची आवश्यकता असल्याचे मत विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मांडले.**

**त्याचप्रमाणे पर्यावरण कर वसुल करण्याची तरतूद अस्तित्वात आहे. मात्र हा कर वसुलीसाठी विभागाकडे कोणतीही यंत्रणा नाही व लोक स्वतःहून अशा जुन्या वाहनांची नोंदणी रद्द करण्यास समोर येत नाहीत. या कायद्याचा मुळ उद्देश हा लोकांनी जुनी वाहने चालवू नयेत, जेणेकरून त्यामुळे होणारे प्रदुषण टाळता येईल व तरीही अशी वाहने चालविल्यास पर्यावरण कर देय ठरेल. महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात आकारणी केलेली वसुलपात्र रक्कम व विभागाने निश्चित केलेल्या रकमेत तफावत दिसून येते. वसुलीसाठी निश्चित केलेली कार्यपद्धती व वसुलपात्र रकमेसंदर्भात महालेखाकार व विभागीय प्रतिनिधी यांनी एकत्रित बसून सहमतीने वसुलपात्र रकमेची निश्चिती करावी. त्याचप्रमाणे रु.२७.०९ कोटी रक्कमेपैकी जी रक्कम निर्लेखित करण्यासारखी आहे ती सामोपचाराने निर्लेखित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात यावा व उर्वरित रक्कम तात्काळ वसुल करण्यात यावी. तसेच कराची कमी आकारणी व वसुलीसाठी जबाबदार अधिकारी/कर्मचा-यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ५.४ "लेखापरीक्षा अभिक्षणे"**

**परिच्छेद क्रमांक ५.४.१ "प्रवासी कराची वसूली न करणे"**

**अभिप्राय :**

**३.६** मुंबई मोटार वाहन (प्रवासी कर) अधिनियम, १९५८ मध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार, कलम २१ आणि नियम ३A अंतर्गत प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही नगरपालिका क्षेत्रात आणि नगरपालिका व लगतच्या ग्रामीण भागात जोडणा-या रस्त्यांवर टप्पा वाहतुकीने नेणा-या प्रवाशांना टप्पा वाहतूकीच्या चालकांना देय प्रवास भाडयाच्या रक्कमेसह ३.५ टक्क्यांपेक्षा जास्त असलेल्या कराच्या रक्कमेची माफी दिली.

परंतु नागपूर महानगरपालिकेने फेब्रुवारी, २००७ मध्ये शहर बस परिवहन यंत्रणेचा कार्यभार महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळाकडून आपल्या हाती घेतला आणि एका एजन्सी सोबत नागपूर शहरात बांधा,वापरा आणि मालकी हक्क तत्वावर बस वाहतूक सेवा देण्यासाठी एक करारनामा आणि पूरक करारनामा (अनुक्रमे फेब्रुवारी, २००७ आणि मार्च, २०१०) केला. सदर करारनाम्याच्या खंड ४.१ अनुसार शासनास सर्व कर अदा करण्यास एजन्सी जबाबदार होती.त्यानुसार NMC च्यावतीने एजन्सीने शहर बस सेवा प्रदान केली. तथापि टिकीट विक्रीतून प्राप्त झालेल्या रकमेचे तपशील परिवहन कार्यालय आणि नागपूर महानगरपालिका या दोन्हींकडे नव्हते. एजन्सीने टिकीट विक्रीपासून २००६-२००७ ते २०१३-२०१४ दरम्यान एकूण रु.२३४.४५ कोटी वसूल केले ज्यात शासनास देय असलेला रु.७.९३ कोटी रकमेचा प्रवासी कर अंतर्भुत होता. त्यापैकी आजपर्यत फक्त रू.७ लाख शासन खात जमा करण्यात आले आहे. अशाप्रकारे नागपूर महानगरपालिका/एजन्सीने प्रवासी कराचे रु.७.८६ कोटी अदा केले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

महालेखाकारांनी मुंबई मोटार वाहन (उतारुवरील कर आकारणी) अधिनियम, १९५८ आणि नियम १९५९ च्या तरतुदीनुसार प्रवासी कराची आकारणी ७ कोटी ९३ लाख महानगरपालिकेकडे थकीत असल्याबाबत शासनास अवगत केले आहे. तसेच प्रवासी कर व बालपोषण अधिभार अदा न केल्याबाबत नागपूर महानगरपालिकेवर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली.

यासंदर्भात विभागाने समितीसमोर स्पष्ट केले की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ यांच्यातर्फे चालविण्यात येत असलेली बस सेवा नागपूर महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. या प्रवासी करापोटी सन २०१३-१४ पर्यंत परवानाधारकाकडून रू.७.९३ कोटी प्रवासी कर व मोटार वाहन कर शासनास अदा करायचे होते. त्याअनुषंगाने विशेष तपासणी पथकाद्वारे बसेस अटकावून ठेवण्यात आल्या होत्या. तथापि, अटकाऊन ठेवलेली वाहने मोटार वाहन कर व तडजोड शुल्क वसूल करून मुक्त करण्यात आली.

तसेच प्रवासी कर व बालपोषण अधिभाराची रक्कम रू.७.९३ कोटी व अतिरिक्त व्याज वाहतूकदारास शासनाने दयावयाच्या सवलती प्रतिपुर्ती रक्कम रू.५३,८८,२९,१९२ मधून कपात करून सवलत रकमेची प्रतिपुर्ती करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर यांनी मुंबई मोटार वाहन (प्रवाशांवरील कर) नियम, १९५८ च्या नियम ७ अनुसार प्रवासी कर भरलेला नसल्यामुळे नमुना ६ मध्ये मागणीपत्र दिनांक ०१.०९.२०१६ व दि.२१.०२.२०१८ रोजी महानगरपालिका नागपूर यांना पाठविले आहे. नागपूर महानगरपालिकेन शहर बस वाहतूकीतील २३० वाहने स्क्रॅप करून त्यामधून प्राप्त होणा-या रकमेतून थकीत प्रवासी कर व बालपोषण अधिभाराचा भरणा करणेबाबत नमूद केले.

नागपूर महानगरपालिकेने मुंबई मोटार वाहन (प्रवासी कर) अधिनियम, १९५८ अनूसार विवरण सादर केले नाही आणि रु.७.८६ कोटी प्रवासी कराची कमी वसुली मान्य केली. नागपूर महानगरपालिकेने नेमलेल्या एजन्सीला सन २००६-०७ ते २०१३-१४, या कालावधीमध्ये तिकिटाच्या विक्रीतून रु. २३४.४५ कोटी प्राप्त झाले. या रकमेमध्ये ७.९३ कोटी प्रवासी कराचा अंर्तभाव होता. परंतु या रकमेपैकी फक्त ७ लाख रकमेचा भरणा शासकीय खात्यामध्ये केला आहे. आणि रु.७.८६ कोटी रक्कम प्रलंबित आहे.

**शिफारस :**

**३.७ (१) प्रवासी कराची वसुली न करणे यासंदर्भात महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात आक्षेप नोंदविलेले असून एजन्सीद्वारे वसूल करण्यात आलेल्या करामधून प्रवासी कराची अदायगी न केल्यामुळे रु.७.८६ कोटी प्रवासी कराची कमी वसुली**

**झाली. हा विषय नागपूर, पुणे, नाशिक इ. जिल्ह्यांचा असून महानगरपालिकेने प्रवासी कर वसूल करून तो शासनाकडे जमा करावा अशाप्रकारचे आदेश देण्यात आलेले आहेत. नागपूर, पुणे व नाशिक महानगरपालिकांनी आर्थिक परिस्थितीमुळे हा कर कधीच भरलेला नाही. विभागाची ही वसुली करण्याची इच्छा असली तरीही ही वसुली आता करता येणे शक्य नाही. त्यामुळे ही वसुलीदेखील निर्लेखित करणेबाबत विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर विदित केले. महानगरपालिकेकडील ही सेवा अजूनही सुरू असतानाही अद्यापही महानगरपालिकेकडून शासनाला कर भरला जात नाही.**

**सन २००५-०७ पासून प्रवासी कर आणि बालपोषण अधिभार भरण्यात आलेला नाही. नागपूर महानगरपालिकेने यासाठी खाजगी ऑपरेटर लावलेला आहे. त्यामुळे ज्याठिकाणी कर भरणा नसल्यामुळे अशा गाड्या बंद करण्याचे आदेश दिले तर वाहने बंद होणार, त्यामुळे अशी प्रस्तावित कारवाई थांबविली जाते. सन २००७ पासून हा प्रवासी कर व बालपोषण अधिभार भरण्यात आलेला नाही. फक्त रु.७ लक्ष भरण्यात आलेले आहेत. नागपूर महानगरपालिकेने सन २००७-१६ या कालावधीत कार्यरत असलेल्या जुन्या कंत्राटदाराला रद्द केलेले आहे व त्यांचेमार्फत ही सेवा सुरू आहे. फेब्रुवारी, २०१७ मध्ये वाहतूक सुरू केली. आता नवीन मल्टीपल ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आली. सन २०१६ पर्यंतचा सर्व महसूल खाजगी कंपनीकडे जात होता. त्या कंपनीवर थकीत रक्कम असल्यामुळे आर्बिट्रेशनची केस सुरू असून ती अंतिम टप्प्यात आहे. नागपूर महानगरपालिकेने वाहतूक सुरू केल्यानंतर सुरुवातीच्या काळात ही वसुली ३० ते ३५ टक्के होती. परंतु आता ती ५४ ते ५५ टक्के आहे. त्यामुळे कर भरण्याची तयारी सुरू असल्याने व प्रलंबित रक्कम सन २०२० पर्यंत भरण्याचे नियोजन असल्याचेही समितीस सांगण्यात आले. त्या विविध व्यक्तींना दिलेल्या सवलतीपोटी नागपूर महानगरपालिकेला शासनाकडून रु.७५ कोटी येणे बाकी असल्यामुळे ही वसुली करू नये असे महानगरपालिकेचे म्हणणे आहे. शासनाच्या नगरविकास विभागाकडून रक्कम येणे बाकी आहे म्हणून प्रवासी कर वसुल करण्यात आलेली कराची रक्कम परिवहन विभागाने घेऊ नये अशी नागपूर महानगरपालिकेची भूमिका काही संयुक्तिक वाटत नाही. वसुलपात्र रक्कम त्या त्या विभागाशी स्वतंत्ररित्या समायोजित करावी. अतः याअंतर्गत वसुलपात्र सर्व रकमेची तातडीने वसुली करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**(२) परिवहन विभागाकडे मालमत्ता कराची रु.७ कोटीची थकबाकी आहे. तसेच महानगरपालिकडे प्रवासी कराची थकबाकी आहे. परिवहन विभागाने व महानगरपालिकेने या कराचे समायोजन विभागांतर्गत करण्यासंदर्भात सामोपचाराने निर्णय घेण्यात यावा. सन २०१७ पुर्वी रु.७ कोटी व त्यानंतर रु.५.५ कोटी असा रु.१२.५ कोटी महानगरपालिकेचा कर प्रलंबित आहे. यावर परिवहन विभागानेदेखील कराचे समायोजन करण्याची तयारी दर्शविली. अतः तातडीने या रकमेचे समायोजन करून उर्वरित वसुलपात्र रक्कम तात्काळ वसूल करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ५.४.२ "मोटार वाहन कराची वसूली न करणे"**

**अभिप्राय :**

**३.८** MMVT अधिनियम च्या कलम ४ आणि त्याअंतर्गत केलेल्या नियमानुसार राज्यामध्ये वापरण्यासाठी ठेवलेल्या सर्व वाहनांवर नोंदणी केलेल्या भारित वजनानुसार किंवा आसन क्षमतेनुसार विहित केलेल्या दराने कर भरावयाचा असतो. राज्यामध्ये वापरासाठी ठेवलेल्या ज्या वाहनांवर उपकरणे बसविलेली असतात. त्यावर त्यांच्या विभारित वजनाच्या आधारावर विहित दराने कर देय असतो. वाहन मालकाकडून केलेली वसुली जारी केलेल्या मागणी नोटीसा इत्यादींची माहिती रोख शिल्लक आढावा नोंदवित (CBRR) ठेवलेली असते.

माहे जानेवारी २०१३ ते मार्च २०१४ दरम्यान १४ कार्यालयांच्या CBRR वरून असे आढळून आले की परिवहन श्रेणीतील वाहने (बस)/ परिवहन श्रेणीतील वाहने (माल) उपकरणे बसविलेली वाहने अशाप्रकारच्या ३३० वाहनांच्या बाबतीत माहे जुलै २००९ ते मार्च २०१४ दरम्यान एक महीना ते ४७ महीने या कालावधीसाठीचा रु.९९.३१ लाख इतका कर वसूल करण्यात आला नव्हता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

जानेवारी, २०११ ते मार्च, २०१४ दरम्यान हे निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने अभिक्षण मान्य केले आणि ११९ प्रकरणांत माहे मे २०१३ आणि डिसेंबर २०१५ दरम्यान रु. २४.२२ लाखाची वसूली केल्याचे कळविले. सदर परिच्छेदामध्ये एकूण १४ कार्यालयांचा अंतर्भाव आहे. त्यापैकी अकलूज, हिंगोली, जालना, व श्रीरामपूर या ४ कार्यालयांची पूर्णतः वसुली झालेली आहे. उर्वरीत १० कार्यालयांची अंशतः वसुली झाली आहे.

सदर परिच्छेदात दर्शविलेल्या एकूण ३३० प्रकरणांतील रु. ९९.३१ लाख इतक्या रकमेपैकी २३८ प्रकरणांची रक्कम रु. ५६.८७ लाख वसुली करण्यात आली आहे. उर्वरीत ९२ प्रकरणांतील रु. ४२.४३ लाख वसुली होणे प्रलंबित वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले.

**शिफारस :**

**३.९ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी मोटार वाहन कराची वसुली न करणे यांसदर्भात आक्षेप नोंदविलेले असून ३३० प्रकरणांत विविध प्रकारच्या वाहनांवर रु.९९.३१ लाख रकमेची मोटार वाहन कराची वसुली झाली नव्हती. सद्यःस्थितीत रु.४२.४३ लाख रकमेची वसुली शिल्लक आहे. यासंदर्भात या सर्व लेख्यांची तपासणी करून सर्व वसुलपात्र रकमेची तात्काळ वसुली करण्यात यावी व नियमाप्रमाणे मोटार वाहन कराची वसुली न केलेल्या अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट-१
## (परिच्छेद क्र.५.२ अंतर्गत लेखापरीक्षा)

| वर्ष | नियोजित युनिट्सची संख्या | लेखापरिक्षा केलेल्या युनिट्सची संख्या | लेखापरीक्षा अभिक्षणांची संख्या | ३१.०३.२०१५ पर्यंत निपटारा केलेली लेखापरीक्षा अभिक्षणे | ३१.०३.२०१५ रोजी प्रलंबित अभिक्षणे | मार्च २०१९ पर्यंतच्या प्रलंबित आक्षेपांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१०-११ | १९ | १९ | ४५४ | ३६२ | ९२ | ६८ |
| २०११-१२ | १८ | १८ | ३३२ | २५८ | ७४ | ६६ |
| २०१२-१३ | २९ | २९ | १,१७१ | ८०६ | ३६५ | २६४ |
| २०१३-१४ | ३२ | ३२ | ६९३ | १९३ | ५०० | ४५१ |
| २०१४-१५ | २ | २ | ३५ | ० | ३५ | ४६६ |

# परिशिष्ट २

## (परिच्छेद क्र. ५.३ - लेखापरीक्षा परिणाम)

(रक्कम रूपयात)

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | एकूण परिच्छेद | एकूण आक्षेपित | | एकूण वसुली केलेले | | प्रलंबित | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रकरणे | रक्कम | प्रकरणे | रक्कम | प्रकरणे | रक्कम |
| १ | मुंबई (मध्य) | १४ | १४ | १४६९४१६० | १० | १४५८९७२४ | ४ | १०४४३६ |
| २ | मुंबई (पूर्व) | ८ | ७२ | ८२९०२० | ५१ | ४२९६१७ | २१ | ३९९४०३ |
| ३ | मुंबई (प) | १२ | १२६ | ५२३६८०५ | ८५ | २४७९५३७ | ४१ | २७५७२६८ |
| ४ | ठाणे | ९ | ७३ | ३९५०९३५ | ३० | २१५६५५७ | ४३ | १७९४३७८ |
| ५ | वाशी | ४ | ४० | १३९५०२६ | २५ | १९५८०५ | १५ | ११९९२२१ |
| ६ | रत्नागिरी | ८ | ४६ | ८६८७४५ | ३३ | ६९४८४० | १३ | १७३९०५ |
| ७ | सिंधुदुर्ग | ६ | २४ | ३६९७८४ | २४ | ३६९७८४ | ० | ० |
| ८ | पेण | ७ | २५ | १३४२६४१ | २० | ११९११८४ | ५ | १५०६५७ |
| ९ | पूणे | ५ | १०७ | १५३२४१२ | १०५ | १५२२१०८ | २ | १०३०४ |
| १० | अकलूज | ४ | ११९ | १०३४०५९ | ५ | १३००० | ११४ | १०२१०५९ |
| ११ | बारामती | ५ | ३२ | ६४७२७७ | ० | ० | ३२ | ६४७२७७ |
| १२ | सोलापूर | ९ | ३१ | २४८५०८ | ३१ | २४८५०८ | ० | ० |
| १३ | कोल्हापूर | ७ | ५७ | ८९११०५ | ४४ | ६०१४९४ | १३ | २९७६११ |
| १४ | सांगली | ९ | ७० | ६२९९५२ | ६३ | ५८५६९६ | ७ | ४४२५६ |
| १५ | सातारा | ७ | ४३ | ४८६४१४ | ३७ | ३८६७३२ | ६ | ९९६८२ |
| १६ | नाशिक | ११ | १२५ | ६३०५४६ | १२५ | ६३०५४६ | ० | ० |
| १७ | अहमदनगर | ६ | ५१ | ९८१६५१ | ५१ | ९८१६५१ | ० | ० |
| १८ | श्रीरामपूर | ७ | ९९ | १५२८२२९ | ९३ | १४४९९१८ | ६ | ७८३११ |
| १९ | मालेगाव | ५ | ५० | ३७७००० | ४२ | २८६४५० | ८ | ९०५५० |
| २० | औरंगाबाद | ८ | २६६ | ७२९३१३५ | १८९ | ५११३४५३ | ७७ | २१७९६८२ |
| २१ | जालना | ४ | ५० | ८७५५५८ | ३७ | ५९८२२३ | १३ | २७७३३५ |
| २२ | बीड | ५ | ४४ | २१४२४१७ | १६ | ५८३२२४ | २८ | १५५९१९३ |
| २३ | नांदेड | ८ | ८६ | ८४६८८० | ८६ | ८४६८८० | ० | ० |
| २४ | परभणी | ५ | ४३ | ५६५७१२ | ० | ० | ४३ | ५६५७१२ |
| २५ | हिंगोली | ८ | ९७ | १००३५२३ | ४४ | ४६९३३४ | ५३ | ५३४१८९ |

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | एकूण परिच्छेद | एकूण आक्षेपित | | एकूण वसुली केलेले | | प्रलंबित | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रकरणे | रक्कम | प्रकरणे | रक्कम | प्रकरणे | रक्कम |
| २६ | धुळे | १५ | १५९ | ३८२९०२० | ७४ | ९२२०२३ | ८५ | २९०६९९७ |
| २७ | जळगाव | ८ | ३३ | ३५७८६८ | १९ | २१६३८९ | १४ | १४१४७९ |
| २८ | नंदुरबार | ७ | ५ | १५९२६१८ | १ | ३८८००० | ४ | १२०४६१८ |
| २९ | लातूर | ६ | ९० | १७४८५३५ | ६६ | ८०५१२६ | २४ | ९४३४०९ |
| ३० | उस्मानाबाद | ७ | ७५ | ४७७५३१ | ३७ | १९९२८३ | ३८ | २७८२४८ |
| ३१ | अंबेजोगाई | ६ | २६ | ५४५४५३ | १६ | २४७२६४ | १० | २९८१८९ |
| ३२ | अमरावती | ९ | ० | १९९९०१२७७ | ० | १९९९०१२७७ | ० | ० |
| ३३ | अकोला | १० | ० | ५६९०१७९ | ० | ५६९०१७९ | ० | ० |
| ३४ | बुलढाणा | ४ | ० | २९८८८०६ | ० | ८३१०२६ | ० | २१५७७८० |
| ३५ | वाशिम | ५ | ० | ३३०८६७ | ० | १०३०१७ | ० | २२७८५० |
| ३६ | नागपूर (शहर) | ६ | ० | २४३४१३४५५ | ० | ० | ० | २४३४१३४५५ |
| ३७ | वर्धा | १३ | ० | ५२०३४५३ | ० | १२५९८९९ | ० | ३९४३५५४ |
| ३८ | नागपूर (ग्रामिण) | ६ | ० | २७५६४०५ | ० | २५६६६५५ | ० | १८९७५० |
| ३९ | चंद्रपूर | १० | ० | २९५३४८७४ | ० | २८५५५२८२ | ० | ९७९५९२ |
| ४० | गडचिरोली | ९ | ० | १४०४३८१ | ० | ११७३४०४ | ० | २३०९७७ |
| ४१ | गोंदीया | ८ | ० | २०२५८२८४९ | ० | २०२५८२८४९ | ० | ० |
| ४२ | परिवहन आयुक्त कार्यालय | ८ | ५ | ३६७३८१ | ५ | ३६७३८१ | ० | ० |
| एकूण | | २९९ | २१८३ | ७५३१३४४४६ | १४६४ | ४८२२३४११९ | ७१९ | २७०९००३२७ |

# परिशिष्ट- ३

**(परिच्छेद क्र. ५.४.२- मोटार वाहन कराची वसुली न करणे)**

**(रक्कम रूपयांत)**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | स्था.ले.प अहवाल क्रमांक | एकूण आक्षेपित | | एकूण वसुली केलेले | | प्रलंबित | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रकरणे | रक्कम | प्रकरणे | रक्कम | प्रकरणे | रक्कम |
| १ | अकलूज | १९०८४ | १८ | १२४००० | १८ | १२४००० | ० | ० |
| २ | परभणी | १९१०३ | १२ | १७१५८३ | १० | १३४३३५ | २ | ३७२४८ |
| ३ | हिंगोली | १९१४१ | ७ | ८०३८१ | ७ | ८०३८१ | ० | ० |
| ४ | नाशिक | १९१७५ | ४१ | ७४९२५० | १५ | २८६६५० | २६ | ४६२६०० |
| ५ | औरंगाबाद | १९१८० | ४५ | ५२६७०१ | ३९ | ४६१७२७ | ६ | ६४९७४ |
| | | १९१८० | ३० | १४७६६८९ | २३ | ११८२२१५ | ७ | २९४४७४ |
| ६ | जालना | १९२३९ | १७ | ७६५०० | १७ | ७६५०० | ० | ० |
| ७ | पुणे | १९३०७ | २० | २२०४०६ | १९ | २०९५१६ | १ | १०८९० |
| | | १९३०७ | २० | ११५४०१७ | १४ | ७०७५२३ | ६ | ४४६४९४ |
| ८ | कल्याण | १९२१७ | १४ | २७७४४० | ९ | १९१५९५ | ५ | ८५८४५ |
| | | १९२१७ | १७ | ७६१८३८ | १५ | ५३५१३४ | २ | २२६७०४ |
| ९ | अंबेजोगाई | १९२४८ | ३० | ४०९५६६ | १२ | ११८८१२ | १८ | २९०७५४ |
| १० | धुळे | १९३७६ | १२ | ३८१२५८ | ११ | २९४१३८ | १ | ८७१२० |
| | | १९३७६ | ९ | १८७०८७३ | २ | १८९१५० | ७ | १६८१७२३ |
| ११ | वाशी | १८८५८ | ७ | २९८६६८ | ३ | १०६५२४ | ४ | १९२१४४ |
| १२ | मुंबई (मध्य) | १९१६० | ११ | ७६०१५५ | ९ | ५४८०२० | २ | २१२१३५ |
| १३ | श्रीरामपूर | १९२५९ | ५ | ७९५०० | ५ | ७९५०० | ० | ० |
| १४ | पेण | १९३६८ | १५ | ५१२५२५ | १० | ३६१८६८ | ५ | १५०६५७ |
| **एकूण** | | | **३३०** | **९९३१३५०** | **२३८** | **५६८७५८८** | **९२** | **४२४३७६२** |

# परिशिष्ट-ब

**मंगळवार, दिनांक ११ जून, २०१९**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ११ जून, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४.२५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(८) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.

(९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(११) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(१२) श्री. प्रसाद लाड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-**

श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

**निमंत्रित :-**

**महालेखाकार कार्यालय :**

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई.

**वित्त विभाग :-**

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

**विभागीय प्रतिनिधी :-**

**गृह (परिवहन) विभाग :-**

श्री. आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव, गृह (परिवहन) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्रमांक ५.१, ५.२, ५.३ व ५.४ यासंदर्भात प्रधान सचिव, गृह (परिवहन) विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २३ जुलै, २०१९**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन सायंकाळी ५.०० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(६) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(८) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

(३) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

(४) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील गृह (परिवहन) विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई